
27-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 26-05-2025 22:06 Page 1



कुर्टी-खांडेपारमध्ये अतिक्रमणविरोधी मोहीम सुरूच
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



रोहित आणि विराट दोघांचीही कॅप्टन्सी वेगळी
पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, २७ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 264 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 27 May 2025 | Pages 4 | ₹ 4

# मंत्री गावडेंवर कारवाई करणार : मुख्यमंत्री

## आदिवासी कल्याण खात्याबाबतचे वक्तव्य भोवले : गोविंद गावडे अडचणीत

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २६ : कला आणि संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी ’प्रेरणा दिन’ कार्यक्रमादरम्यान केलेले आदिवासी कल्याण खात्यावरचे भ्रष्टाचाराचे आरोप आता त्यांच्या चांगलेच अंगलट येणार आहेत. गावडे यांचे वक्तव्य मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी अतिशय गंभीरपणे घेतले असून मंत्री गावडे यांच्यावर लवकरच कारवाई केली जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सोमवारी पर्वरी येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. या कारवाईत कदाचित गावडे यांच्याकडून मंत्रीपद काढून घेतले जाण्याची पहिली शक्यता वर्तवली जात आहे.**

आदिवासी खात्यात भ्रष्टाचार होत असून जे खाते नियमांचा आधार घेऊन आदिवासी बांधवांवर अन्याय करीत असेल ते खातेच काय कामाचे असे जहाल विधान करून कला आणि संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी प्रेरणा दिन कार्यक्रमात थेट मुख्यमंत्र्यांवरच निशाणा साधला होता. गावडे यांनी आपल्याच पक्षाच्या आपल्याच मुख्यमंत्र्याच्या खात्याबाबत, असे थेट विधान केल्यामुळे सरकारच्या कारभाराचे सरकारच्याच मंत्र्याने





वाभाडे काढले अशी चर्चा जनतेत सुरू आहे. इतकेच नाही तर भाजपाअंतर्गत सर्वकाही आलबेल नाही अशाही प्रतिक्रीया उमटू लागल्या होत्या. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिल्ली दौऱ्यावरून परतताच मंत्री गावडे यांच्या वक्तव्याची गंभीर दखल घेत त्यांच्यावर कारवाईचे स्पष्ट संकेत दिले आहेत. भाजपा प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनीही गावडे यांच्यावर पक्षशिस्तभंगाची कारवाई होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून मंत्री गावडे आणि सभापती रमेश तवडकर यांच्यातील मतभेद वारंवार सार्वजनिकपणे चव्हाट्यावर येत आहेत. यापूर्वीही माजी प्रदेशाध्यक्ष सदानंद तानावडे आणि मुख्यमंत्री सावंत यांनी या वादावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी गावडे यांना बेजबाबदार वक्तव्याबद्दल समज देण्यात आली होती.

मात्र यावेळी मंत्री गावडे यांनी थेट मुख्यमंत्र्यांच्या खात्यातील अधिकाऱ्यांवरच भ्रष्टाचाराचे आरोप करत सरकारची विश्वासार्हता धोक्यात आणल्याची टीका होत आहे.

या प्रकरणी सभापती रमेश तवडकर यांना विचारले असता त्यांनी गावडे यांचे नाव न घेता म्हटले की, एका मंत्र्याने मुख्यमंत्र्यांच्या खात्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करणे हे गंभीर प्रकरण आहे. या खात्याचे प्रमुख स्वतः मुख्यमंत्री आहेत, त्यामुळे या आरोपावर मुख्यमंत्रीच प्रतिक्रिया देतील. मी सभापतीच्या भूमिकेतून यावर बोलणे योग्य ठरणार नाही असे त्यांनी सोमवारी स्पष्ट केले.

पणजी येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आले असताना माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांवर तवडकर म्हणाले, आदिवासी कल्याण खात्याच्या माध्यमातून अनेक चांगल्या योजना सरकारकडून राबविल्या जात आहेत. आदिवासी समाजावर अन्याय होत असल्याचे कुणाला वाटत असेल, तर त्यांनी आपली समस्या थेट मुख्यमंत्र्यांसमोर मांडावी. या सरकारचा उद्देश सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी काम करण्याचा आहे.

पान २ ▶

### काय म्हणाले होते गोविंद गावडे?

**माझ्या जवळच्या अधिकाऱ्यांना जाणीवपूर्वक बाजूला केले जातेय. राजधानीमध्ये प्रस्तावित असलेले ‘आदिवासी भवन’ हे राज्यातील आदिवासी समाजाच्या अस्मितेसाठी अनिवार्य असून त्या कामास सतत चालढकल करणे सहन केले जाणार नाही, आदिवासी भवनासाठी २०२६ पर्यंत प्रत्यक्ष बांधकाम सुरू झालेच पाहिजे; अन्यथा पुढील प्रेरणा दिन शासनाच्या मदतीशिवाय साजरा करायचा की नाही, याचा विचार करावा लागेल, कायद्यावर बोट ठेवून आदिवासी बांधांवर अन्याय करायचाच असेल तर आदिवासीच्या कल्याणाकरता असलेले आदिवासी कल्याण खाते काय कामाचे? ते बंद करा.**

# कुंकळ्ळी औद्योगिक वसाहतीत धोकादायक कचऱ्याचा साठा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २६** : कुंकळ्ळी औद्योगिक वसाहतीत उघड्यावरील धोकादायक औद्योगिक कचरा आढळून आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि चिंता व्यक्त करण्यात येत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या प्रकारामुळे पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक गंभीर परिणामांची भीती निर्माण झाली आहे.

स्थानिक कार्यकर्ते अविराज देसाई यांनी या प्रकाराकडे लक्ष वेधत म्हटले की, औद्योगिक युनिट्समधून निर्माण होणारा विषारी कचरा खुल्या जागेत टाकण्यात आला असून त्यावर कोणतीही संरक्षणात्मक उपाययोजना नाही. पावसाचे पाणी या कचऱ्यातून झिरपून भूजलात किंवा शेतीत शिरल्यास कधीही भरून न येणारी हानी होण्याची शक्यता आहे. प्रशासन मात्र याकडे डोळेझाक करत आहे.

गोवा प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि अन्य संबंधित यंत्रणांनी या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी देसाई यांच्यासह अन्य स्थानिकांनी केली आहे. या संदर्भात बोलताना कुंकळ्ळी येथील रहिवासी प्रिया नाईक म्हणाल्या, दरवर्षी हीच स्थिती असते. कचरा व्यवस्थापनात गंभीर त्रुटी आहेत, अंमलबजावणी शून्य आहे आणि याची किंमत आम्हालाच भरावी लागते.

## नागरिकांमध्ये तीव्र संताप

स्थानिक रहिवासी जोएल फर्नांडिस यांनीही संताप व्यक्त करत म्हटले, हा निष्काळजीपणा आपल्या पाण्याचे स्रोत, शेती आणि भविष्यातील पिढ्यांच्या आरोग्याला धोका पोहोचवू शकतो. अनेक नागरिकांनी औद्योगिक वसाहतीची तातडीने तपासणी करण्याची तसेच संपूर्ण परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेण्याची मागणी केली आहे. काहींनी दोषी औद्योगिक युनिट्सवर कायदेशीर कारवाई करण्याचीही गरज व्यक्त केली.

स्थानिक व्यापारी राजन मेनेझेस म्हणाले, उद्योगांना येथे काम करायचे असेल, तर त्यांनी जबाबदारीने वागायला हवे. कायद्याच्या चौकटीत राहूनच त्यांना उत्पादन करावे लागेल. कायद्याच्या वर कोणीही नाही. देसाई यांच्यासह पर्यावरण कार्यकर्त्यांनी इशारा दिला आहे की, जर तात्काळ उपाययोजना केल्या गेल्या नाहीत, तर ते हे प्रकरण राज्य सरकार व पर्यावरण विभागाकडे अधिकृतरीत्या सादर करतील. सध्या या प्रकारामुळे स्थानिकांमध्ये असंतोष शिगेला पोहोचला आहे. पावसाळ्यात अशा प्रकारचे कचरा साठे अधिक धोकेदायक ठरू शकतात, त्यामुळे प्रशासनाकडून तात्काळ कारवाई होणे अपेक्षित आहे.

## निवडक

### ट्रम्प यांचे नाव वापरून १५० लोकांची फसवणूक

**बंगळुरू, दि. २६** : अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाचा वापर करून एका टोळीने दीडशेहून अधिक लोकांची सुमारे एक कोटी रुपयांहून फसवणूक केल्याचे पुढे आले आहे. सायबर गुन्हेहारांनी ट्रम्प यांच्या नावावर असलेल्या ॲपचा वापर करून बंगळुर, तुमकूर ते मंगळूर आणि हवेरी अशा शहरांमध्ये हा कारनामा केल्याचे पुढे आले आहे.

या सायबर गुन्हेगारांच्या कारवायांबाबत राज्यातील पोलिस ठाण्यांमध्ये तक्रारी दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. फसवणूक करणाऱ्यांनी सोशल मीडिया पोर्टलवर आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) टूल्स वापरून ट्रम्प यांच्या व्हिडिओ प्रसारित केला. त्याव्दारे गुंतवणुकीवर मोठ्या परताव्याचे आमिष दाखविले. लोकांनी व्हिडिओसोबत असलेल्या क्रमांकावर संपर्क साधला तेव्हा फसवणूक करणारे त्यांना त्यांच्या जाळ्यात अडकण्यात यशस्वी झाले.

### लायबेरियाचे मालवाहू जहाज केरळजवळ बुडाले

**कोची, दि. २६** : सुमारे ६४० कंटेनर घेऊन जाणार लायबेरियाचे मालवाहू जहाज केरळच्या किनाऱ्याजवळ बुडाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या कंटेनरमध्ये धोकादायक रसायनांच्या १३ कंटेनरचा समावेश असल्याने सागरी पर्यावरणाला हानी पोचण्याची भीती वर्तविली जात आहे.

आज पहाटे लायबेरियाचे ‘एमएससी ईएलएसए ३’ मालवाहू जहाज कलंडून बुडाले, अशी माहिती तटरक्षक दलाने निवेदनाद्वारे दिली. केरळमधील कोचीजवळच्या समुद्रकिनाऱ्यावर शनिवारी हे जहाज बुडण्यास सुरुवात झाली होती. त्यानंतर मदत व बचावकार्य हाती घेण्यात आले. नौदलाच्या ‘आयएनएस सुजाता’ या जहाजाद्वारे या बुडणाऱ्या जहाजावरील उर्वरीत तीन कर्मचाऱ्यांना वाचविण्यात आले. समुद्रात तेलगळती होऊन संभाव्य जलप्रदूषण रोखण्यासाठी ‘सक्षम’ हे जहाजही तैनात करण्यात आले. जहाजावरील ६४० कंटेनरपैकी १३ कंटेनरवर धोकादाय रसायने असून १२ कंटेनर कॅल्शिअम कार्बाइडचे आहेत.

### इस्त्रायल-गाझात २५ लोकांना जिवंत जाळले

**गाझा, दि. २६** : ७ ऑक्टोबर २०२३ रोजी सुरू झालेल्या इस्त्रायल-हमास युद्धाने आता पूर्णपणे नरसंहाराचे स्वरूप घेतले आहे. युद्धाच्या अठ्ठावीसव्या आठवड्यात इस्त्रायलने गाझा पट्टीवर केलेल्या भीषण हवाई हल्ल्यात एका बालवाडी शाळेवर टाकलेल्या बॉम्बमुळे २५ लोक जिवंत जळून मृत्युमुखी पडले. ही शाळा निर्वासित छावणी म्हणून वापरली जात होती. मृतांमध्ये रेड क्रॉसचे कर्मचारी, पत्रकार, लहान मुले आणि गाझातील सर्वात तरुण सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर याकिन हम्मद (वय ११) यांचा समावेश आहे.

अल जझीराच्या वृत्तानुसार, शाळेला लागलेल्या आगीत संपूर्ण इमारत भस्मसात झाली, आणि अनेक लोक अडकून पडल्यामुळे त्यांचा आगीत होरपळून अंत झाला. या भीषण घटनेमुळे इस्रायलवर आंतरराष्ट्रीय स्तरावर निषेधाचा पाऊस सुरू झाला आहे. स्पेनने इस्रायलवर निर्बंध लावण्याची मागणी जगभरातील देशांकडे केली आहे. युद्धात आतापर्यंत ५५,००० हून अधिक पॅलेस्टिनी नागरिक मारले गेले आहेत, ज्यात हजारो लहान मुले, महिला आणि वृद्धांचा समावेश आहे. गाझामध्ये १९ लाख लोक विस्थापित झाले असून, त्यातील बहुतांश लोक रस्त्यावर राहत आहेत.गाझा मीडिया कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, गाझाच्या ७० टक्क्यांहून अधिक नागरी पायाभूत सुविधा उद्ध्वस्त झाल्या आहेत. गाझा पट्टीच्या ७७% भागावर इस्रायलने ताबा मिळवला आहे, आणि लाखो नागरिकांना जबरदस्तीने बेदखल करण्यात आले आहे. इस्रायली सैन्याने ‘नेत्झरिम कॉरिडॉर’च्या माध्यमातून गाझा दोन भागात विभागले असून, नागरिकांची मुक्त हालचाल जवळपास अशक्य झाली आहे.

# ट्विन टॉवर्स प्रकल्पावरून काँग्रेसची सरकारवर जोरदार टीका

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २६** : झुआरी केबल-स्टेड पुलाजवळ कुठ्ठाळी येथे उभारण्यात येणाऱ्या ट्विन टॉवर्स प्रकल्पासाठी प्रस्तावित २७० कोटी रुपयांच्या खर्चावरून कुठ्ठाळी काँग्रेस ब्लॉकने राज्य सरकार आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

प्रकल्पस्थळी पत्रकारांशी बोलताना काँग्रेस नेते ओलेन्सियो सिमोस आणि स्थानिक नागरिकांनी या प्रकल्पाला अनावश्यक आणि व्यर्थ खर्च ठरवत त्याचा तीव्र निषेध केला. सौंदर्यवर्धनाच्या नावाखाली एवढा मोठा निधी खर्च करण्याऐवजी, तो निधी राज्यातील अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि रस्ते सुरक्षेच्या समस्यांकडे वळवावा, अशी मागणी सिमोस यांनी केली.

गोव्यात ओळखण्यात आलेले ६१ अपघातप्रवण ‘ब्लॅक स्पॉट्स’ दुरुस्त करण्याची गरज अधिक तातडीची आहे. सौंदर्यवर्धनापेक्षा नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले पाहिजे, असे सांगताना सिमोस यांनी राष्ट्रीय पातळीवरील आकडेवारीचा हवाला दिला. प्रत्येक वर्षी सुमारे १.७८ लाख नागरिक रस्ते अपघातांमध्ये प्राण गमावतात. गोव्यात या वर्षी आतापर्यंत २२ गंभीर अपघातांत मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली आहे, असे त्यांनी नमूद केले.

सिमोस यांनी असा आरोप केला की सांकवाळ व वेर्णा या दोन औद्योगिक वसाहतींमध्ये येणाऱ्या कुठ्ठाळी मतदारसंघातील रहिवाशांना अद्यापही वीज आणि पाण्यासारख्या मूलभूत सेवा सुरळीतपणे उपलब्ध नाहीत. दररोज चार वेळा वीज खंडित होते. यामुळे घरगुती वापरासह व्यावसायिक व्यवहारही प्रभावित होतात. पाणीपुरवठाही दररोज केवळ दोन ते तीन तासांपुरता मर्यादित आहे, त्यामुळे रहिवाशांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागते, असे त्यांनी सांगितले.

सिमोस यांनी पुढे स्पष्ट केले की, कुठ्ठाळी परिसरात कचरा वर्गीकरण युनिट, प्रक्रिया प्रकल्प किंवा सांडपाणी प्रक्रिया केंद्रच उपलब्ध नाही. येथे अनेक बहुमजली निवासी प्रकल्प विकसित केले जात असताना मूलभूत नागरी सुविधांकडे दुर्लक्ष केले जात आहे.

पान २ ▶


# महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा कहर

▶ मुंबई मेट्रो स्थानकात पाणी

**मुंबई, दि. २६ :**

महाराष्ट्रात शनिवार (२५ मे) रात्रीपासून विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली असून, अनेक जिल्ह्यांमध्ये पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, मुंबई, पुणे, रत्नागिरीसह अनेक ठिकाणी पाणी तुंबल्याचे दृश्य दिसत आहे.

मुंबईत मेट्रो-३ प्रकल्पाच्या ॲक्वा लाईनवरील आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानकात पावसाचे पाणी शिरल्याने प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागला. ॲनी बेझंट रोडलगत असलेल्या या भुयारी स्थानकाच्या प्रवेशद्वारावर सांडपाण्याच्या नाल्यातून आलेल्या पाण्यामुळे उभारण्यात आलेली तात्पुरती



संरक्षक भिंत कोसळली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी स्टेशनमध्ये साचले.

मेट्रो प्रशासनाच्या माहितीनुसार, स्थानकाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. संबंधित मार्ग प्रवासी वाहतुकीसाठी वापरात नव्हता. संरक्षक भिंतीचे काम १० जूनपर्यंत पूर्ण होण्याचा अंदाज होता; मात्र अवकाळी आणि जोरदार पावसामुळे ही भिंत कोसळल्याचे स्पष्ट करण्यात आले. खबरदारीचा उपाय म्हणून वरळी ते आचार्य अत्रे चौक या दरम्यानची मेट्रो वाहतूक तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. राज्यात अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याच्या घटना घडल्या असून, पुण्याच्या बारामतीत कालवा फुटल्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

नाशिक जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाचा मोठा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. निफाड तालुक्यातील लासलगाव जवळील मरळगोई बुद्रुक येथील शेतकरी उत्तम नामदेव जगताप यांनी पाच एकर क्षेत्रावर उन्हाळी कांद्याचे उत्पादन घेतले होते. बाजारात अपेक्षित भाव न मिळाल्याने कांदा शेतातच साठवण्यात आला होता. मात्र, सततच्या पावसामुळे साठ ते सत्तर टक्के कांदा सडल्याचे त्यांनी सांगितले. परिणामी शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले असून, प्रतिक्विंटल २ हजार रुपये नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात आली आहे.

पान २ ▶

# तीन धोकादायक इमारतींच्या पाडकामाचा निर्णय अहवालानंतर

## फाल्कनजवळील १२ युनिट्स सील | राजधानीतील धोकादायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६** : पणजीतील तीन जुन्या इमारतींना पाडण्याचा निर्णय लवकरच घेतला जाऊ शकतो. गोवा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (जीसीई) कडून करण्यात आलेल्या स्ट्रक्चरल चाचण्यांच्या अंतिम अहवालावर हे निर्णय अवलंबून असतील, अशी माहिती पणजी महानगरपालिकेतील (सीसीपी) एका वरिष्ठ अभियंत्याने दिली.

या इमारतींमध्ये अल्तिन्हो येथील लोकमान्य इमारत (व्यावसायिक वापरासाठी), १८ जून रोडवरील सुशीला इमारत (व्यावसायिक व निवासी मिश्रित), तसेच शैक्षणिक संस्थेसह असलेली मेरी इमॅक्युलेट इमारत यांचा समावेश आहे. सध्या या इमारतींची तपासणी सुरू असून, अंतिम निर्णय संबंधित तांत्रिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर घेण्यात येईल.

अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, जर जीसीईच्या अहवालात कोणतीही इमारत असुरक्षित असल्याचे आढळले, तर त्या







इमारतीला पाडण्याचा निर्णय वरिष्ठ स्तरावर घेतला जाईल.

दरम्यान, महानगरपालिकेने सोमवारी पोलिस बंदोबस्तात एक स्वतंत्र कारवाई करत पणजी मार्केटजवळील फाल्कन इमारतीच्या शेजारील महापालिका मालकीच्या जुन्या इमारतीतील १२ युनिट्स सील केली. गोवा इंजिनिअरिंग कॉलेजच्या स्ट्रक्चरल ऑडिट अहवालात ही इमारत असुरक्षित असल्याचे निष्कर्ष नोंदवण्यात आले होते. संबंधित १२ युनिट्स दोन वेगवेगळ्या मालकांच्या मालकीच्या आहेत.

मात्र, या घटनेतील ११ दुकानधारकांनी गोवा खंडपीठात याचिका दाखल करत तात्पुरता स्थगिती आदेश मिळवला असून, २७ मे पर्यंत सीसीपीच्या कारवाईला न्यायालयीन स्थगिती मिळाली आहे.

या युनिटधारकांमध्ये प्रवीण पेडणेकर यांचाही समावेश असून त्यांच्या वडिलांनी १९६८ साली संबंधित युनिट्ससाठी भोगवटा करार केला होता. पेडणेकर यांनी सांगितले की, माझ्याकडे तिसऱ्या मजल्यावर आठ युनिट्स आहेत. या सर्व युनिट्स पूर्वी एकाच कार्यालयात होत्या, त्यांचे रूपांतर केल्यानंतर त्यांचा स्वतंत्र वापर सुरू झाला.

ते पुढे म्हणाले, सीसीपीकडून आठ वर्षांपूर्वीही अशीच एक चेतावणी आली होती. त्यावेळी आम्ही उत्तर दिले आणि पुढील कोणतीही कारवाई झाली नाही. मात्र यावेळी प्रशासन खूप जलदगतीने पुढे सरसावले.

पेडणेकर यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत म्हटले, यावेळी फक्त २४ तासांचा कालावधी देण्यात आला. वस्तू हलवणे, कायदेशीर सल्ला घेणे - या सर्व गोष्टींसाठी हे वेळेपुरतेही नव्हते. त्यांनी यावर भर दिला की, पूर्वी किमान आठ ते पंधरा दिवसांचा कालावधी दिला जात असे.

पावसाळ्याचा विचार करता हा कालावधी अत्यंत संवेदनशील असल्याचे ते म्हणाले, सर्व काही ठप्प झालं आहे. आम्हाला पर्यायी व्यवस्था दिली नाही, तर आम्ही हलणार कसे? अशा कोणत्याही व्यवस्थेसाठी महापालिकेची जबाबदारी असावी. पेडणेकर यांनी सांगितले की, मे अखेरीस होणाऱ्या अधिकृत सुनावणी दरम्यान ते सक्षम अधिकाऱ्यांसमोर आपली बाजू मांडण्याची योजना आखत आहेत.